असा. क्र. ४९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, ऑगस्ट २५, २००५/भाद्र ३, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.**–महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . . . . . . ४७३–४७५

दिनांक २४ ऑगस्ट २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६१ चा महा. २४. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



[ **किंमत :** रुपये ९.०० ]

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये " कृषी आणि ग्रामीण विकास बँकेचे " या मजकुराऐवजी " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६१ चा महा २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४४क ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४४क मध्ये,—

(क) " (सहकारी बँक धरून, परंतु कृषी आणि ग्रामीण विकास बँक वगळून) " या मजकुराऐवजी " (सहकारी बँक आणि सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक धरून) " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु असे की, सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने कोणत्याही सदस्याला दिलेल्या, एक लाख रुपयांहून अधिक रकमेच्या कर्जाला, या कलमातील कोणतीही गोष्ट, लागू होणार नाही. ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ मध्ये,—

(क) खंड (घ) च्या पहिल्या परंतुकामध्ये, " कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या " या मजकुराऐवजी " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (च) मध्ये, " कृषी आणि ग्रामीण विकास बँकेचे " या मजकुराऐवजी " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४८क ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ४८क मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, " कृषी आणि ग्रामीण विकास बँक " या मजकुराऐवजी " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये, " कृषी आणि ग्रामीण विकास बँकेस " या मजकुराऐवजी, " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेस " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ग ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ग च्या पोट-कलम (२) मध्ये,—

" कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या किंवा शिखर कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या " या मजकुराऐवजी " जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या किंवा राज्य सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३छ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ७३छ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (तीन) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (तीन) सर्व जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका ; ".

८. मुख्य अधिनियमाच्या प्रकरण अकरामध्ये, त्याचे शीर्षक आणि त्यातील कलमांच्या समासटिपा यांसह सर्वत्र, " कृषी आणि ग्रामीण विकास बँका ", " कृषी आणि ग्रामीण विकास बँक ", " राज्य कृषी आणि ग्रामीण विकास बँक ", " प्राथमिक कृषी आणि ग्रामीण विकास बँका ", " जिल्हा कर्ज समिती " आणि " विकास बँक " हा मजकूर जेथे जेथे त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह येईल, तेथे तेथे, त्या मजकुराऐवजी अनुक्रमे " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका ", " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ", " राज्य सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ", " जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक " " जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक " आणि " सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या प्रकरण अकराची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ११२ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मधील, " भू-विकास बँकांबाबत " या मजकुरानंतर, " किंवा कृषी आणि ग्रामीण विकास बँकेबाबत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये, " भू-विकास बँकांच्या " या मजकुरानंतर, " किंवा कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११२ ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाचे कलम ११२क, पोट-कलम (१), खंड (ख) मधील, उप-खंड (चार) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (चार) जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचा व्यवस्थापक— पदसिद्ध ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११२क ची सुधारणा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई